महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ११ वे दिनांक : ३०/१२/२०२५ वार : मंगळवार

## शिंदे गटाच्या शहाजीबापू पाटलांनी सांगितला स्वर्गाचा रस्ता



**सांगोला** : सांगोल्याच्या सभेत बोलताना शिवसेना शिंदे गटाचे नेते शहाजीबापू पाटलांनी अजब वक्तव्य केले आहे. शिवसेनेला मतदान करणारे स्वर्गात जाणार असल्याचे विधान त्यांनी केले आहे. ज्यांनी धनुष्यबाणाचे बटन दाबले त्याला स्वर्गातच जागा आहे, असेही शहाजीबापू पाटलांनी म्हटले आहे.

सभेत बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले, मी खात्रीने सांगतो, ज्यांनी ज्यांनी धनुष्यबाण दाबला त्यांना त्यांना स्वर्गातच जागा आहे. नरकात तुम्हाला देव घेत नाही. स्वर्गात तुम्ही गेल्याशिवाय राहत नाही. देव तुम्हाला नरकात जाऊच देत नसतो. मात्र, ज्यांनी विरोधकांची बटणं दाबली त्यांचे काय खरे नाही त्यांच्यात रामच उरला नाही, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

तसेच यावेळी बोलताना शहाजीबापू पाटलांनी विधानसभेतल्या पराभवावरून देखील दीपक साळुंखेंवर टीका केली. ते म्हणाले, मी भाकरीत साप पाळला होता म्हणूनच मला विधानसभेला पराभवाचा फटका बसला, असे ते म्हणाले. तसेच आपण आजही महायुतीत आहे. आपल्याला युतीचेच काम करायचे असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

पुढे शहाजीबापू पाटील म्हणाले, हा मतदारसंघ 2014 पासून शिवसेनेचा आहे. तुम्ही आमचा सन्मान ठेवा आम्ही तुमचा कोणताही शब्द खाली पडू देणार नाही. पण तुम्ही तसे केले नाही, तर आम्ही पुन्हा एकट्या वाटेने जाऊ, असा इशारा त्यांनी यावेळी भाजपला दिला. शिवाय तुम्ही आताच्या निवडणुकीत ऐकले असते तर तुम्ही सत्तेत निम्मे भागीदार झाला असता, असा टोलाही त्यांनी लगावला.

माजी आमदार व शहाजीबापू पाटलांचे कट्टर विरोधक समजले जाणारे दीपक साळुंखे यांच्यावरही त्यांनी टीका केली. ते म्हणाले, दीपक साळुंखे स्वतःला किंग मेकर म्हणतात. मी जिथे जाईल त्याचा गुलाल असतो असे ते सांगतात. मात्र, ते पांढऱ्या पायांचे असल्यामुळे ते ज्यांच्याकडे जातील त्यांचा पराभव नक्की, अशी जहरी टीका पाटलांनी केली.

## शिंदेच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांची महापालिका निवडणुकीतून माघार



**छत्रपती संभाजीनगर** : शिवसेनेचे माजी उपमहापौर आणि जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांनी आज दुपारी निवडणुकीतून माघार घेतल्याची घोषणा केली. कार्यकर्त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळत नसल्याने हा निर्णय घेतल्याचे त्यांनी शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

जंजाळ यांनी स्पष्ट केले की, सध्याच्या जागावाटपात युती होणार की नाही, याबाबत कोणतीही निश्चिती नाही. भाजपसोबत जागावाटपाबाबत कोणताही प्रस्ताव आलेला नाही. तसेच, शिवसेनेला अत्यंत कमी जागा मिळत असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे.

या परिस्थितीमुळे आपण कालपासून जागावाटप प्रक्रियेतून बाजूला झालो आहोत, असे जंजाळ यांनी सांगितले. कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ नये आणि त्यांना न्याय मिळावा, यासाठी आपण उमेदवारी अर्ज भरणार नसल्याचे त्यांनी नमूद केले.

"आमच्या वाट्याला येणाऱ्या जागा अतिशय कमी आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या छातीवर बसून मला निवडणूक लढायची नाही," असे जंजाळ म्हणाले. या कारणास्तव त्यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याचे सांगितले.

ते पुढे म्हणाले की, इतक्या दिवसांपर्यंत मी युतीच्या जागावाटप प्रक्रियेत सहभागी होतो, मात्र कालपासून मी या प्रक्रियेत नाही. त्यामुळे आता नेमके काय सुरू आहे, याची माहिती मला किंवा खासदार संदिपान भुमरे आणि आमदार प्रदीप जैस्वाल यांनाही नाही.

## संभाजीनगरमध्ये महायुतीत बिघाडी?



**मुंबई** : राज्यातील महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानासाठी राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी युतीची घोषणा केली असून, मुंबईसह राज्यातील महापालिकांमध्ये आता 'ठाकरे' बंधूंचा करिष्मा पाहायला मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी भाजपवर घणाघाती टीका करतानाच, कार्यकर्त्यांना एकनिष्ठ राहण्याचे आवाहन केले. "दोन गुजराती आपल्याला गिळायला निघाले असताना आपण जर आपसात भांडत बसलो, तर ही लढाई न लढलेलीच बरी," अशा शब्दांत त्यांनी आपल्या संघर्षाची दिशा स्पष्ट केली.

कार्यकर्त्यांना संबोधित करताना उद्धव ठाकरे भाजपविरोधात कमालीचे आक्रमक दिसले. ते म्हणाले, "भाजपला महाराष्ट्रात कोणी ओळखत नव्हते, आम्ही त्यांना राज्याच्या कानाकोपऱ्यात आणि खेडोपाडी नेले. आम्ही ज्यांना मोठे केले, आज तेच आमच्यावर वार करत आहेत. भाजपने केवळ युती तोडली नाही, तर ते आपल्याला संपवायला निघाले आहेत. इतकी वर्षे ज्यांनी आपला केवळ उपयोग करून घेतला, त्यांना धडा शिकवण्याची वेळ आता आली आहे."

### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० डिसेंबर २०२५


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात फायनान्स क्लबचे उद्घाटन



**उमरगा :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र, श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत 'फायनान्स क्लबचे' उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले सर यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य प्रा.डॉ. पद्माकर पिटले यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना प्राचार्य अस्वले यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात पैशाची निर्माण होणारी गरज आणि उत्पन्न यात समन्वय कसा साधायचा याविषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातच पैशाची बचत कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले.फायनान्स क्लब हा आर्थिक ज्ञान वाढवण्यासाठी स्थापन केलेला एक शैक्षणिक व उपक्रमशील गट आहे. या क्लबचा मुख्य उद्देश करिअर कट्टा मधील विद्यार्थ्यांना वैयक्तिक वित्त, बचत, गुंतवणूक, बँकिंग, शेअर बाजार, कर नियोजन आणि उद्योजकता यांविषयी माहिती देणे हा आहे. करियर कट्टा अंतर्गत स्थापित फायनान्स क्लब अध्यक्षांसह 10 सदस्यांची निवड करण्यात आली. फायनान्स क्लबचे अध्यक्ष श्री. निरंजन कटके यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकात क्लबची स्थापन्यामागची भूमिका स्पष्ट करून या क्लबच्या माध्यमातून वर्षभरात करावयाच्या कार्याविषयी माहिती दिली. याप्रसंगी डॉ.संजय अस्वले यांना रामलिंगप्पा वैरागकर सामाजिक प्रतिष्ठान तर्फे महात्मा फुले स्मृति कार्य गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल करिअर कट्ट्याच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. बी.ए शेळके, करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा. डॉ. समाधान पसरकल्ले, प्रा. डॉ. अर्जुन कटके, प्रा. डॉ. चंद्रसेन करे व क्लबमधील सदस्य कु. निकिता लवटे,कु. नेहा कटके ,कु. पूजा हांडे, कु. निकिता सूर्यवंशी, कु. आशा जाधव,कु. सरिता स्वामी, कु.जाधव महेश्वरी, कु.पल्लवी रावळे व वैष्णवी जमादार याप्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पूजा हांडे हिने तर आभार श्री. प्रज्वल चव्हाण यांनी मानले.

## मनपा सार्वत्रिक निवडणूक १५ जानेवारी २०२६ जनजागृती रांगोळीच्या माध्यमातून



छत्रपती संभाजीनगर : मनपा प्रा. व माध्य. विद्यालय, मुकुंदवाडी येथे मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी मतदान जनजागृती कार्यक्रम अभियान अंतर्गत रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. त्यासाठी मा. मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले आणि सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला.

## नेमीनाथ जैन यांना राज्यस्तरीय पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कार जाहीर



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** आंतरराष्ट्रीय नामांकन (आय एस ओ ९००१-२०१५) प्राप्त हिंदी मराठी पत्रकार संघ द्वारा आयोजित ' राज्यस्तरीय पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कार २०२६' साठी बोरी ,ता.जिंतूर येथील जेष्ठ पत्रकार तथा साप्ताहिक लोकदिलासाचे संपादक नेमीनाथ जैन यांची निवड करण्यात आली आहे .गेल्या तीन दशकांपासून पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी नेमीनाथ जैन यांना हा अवार्ड प्रदान करण्यात येणार आहे. हिंदी मराठी पत्रकार संघ व दर्पण वृत्तपत्राद्वारे सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार करण्यासाठी "राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्काराचे" आयोजन करण्यात येते. यामध्ये पत्रकारिता, शिक्षण, साहित्य, सामाजिक, खेळ, राजकीय, सौंदर्य, डॉक्टर , वकील ,महिला, सहकार, पतसंस्था, कला , इत्यादी क्षेत्रात कर्तृत्व घडवणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येते. यामध्ये बोरी येथील नेमीनाथ जैन यांची राज्यस्तरीय पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कारासाठी करण्यात आली असून दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी मलकापूर येथील मराठा मंगल कार्यालय हॉलमध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून तिथे मान्यवरांच्या हस्ते नेमीनाथ जैन यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.जैन यांना यापूर्वी पत्रकारिता क्षेत्रातील विविध पुरस्कार मिळाले आहेत.पत्रकार संघटनेच्या राज्य, विभागीय, जिल्हा व तालुका स्तरावर विविध पदांवर त्यांनी काम केले आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जैन यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.





**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० डिसेंबर २०२५


## शिवाजी महाविद्यालय, कन्नड रेड रिबन क्लब अंतर्गत एचआयव्ही/एड्स जनजागृती मार्गदर्शन कार्यक्रम



**कन्नड** : माननीय प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या आदेशान्वये इंटेन्सिफाईड आयईसी कॅम्पेन अंतर्गत तसेच माननीय जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण रुग्णालय, कन्नड येथील आयसीटीसी समुपदेशन केंद्रामध्ये शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथील रेड रिबन क्लब व एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांसाठी एचआयव्ही/एड्स विषयक जनजागृतीपर भेट व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा कार्यक्रम अधिकारी (डापकू) श्रीमती साधना गंगावणे तसेच माननीय वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय कन्नड यांच्या समन्वयातून करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. व्ही. एन. भोसले सर यांचे अमूल्य सहकार्य लाभले.यावेळी श्री संजय सोनवणे (आयसीटीसी समुपदेशक) व श्री शशिकांत गांगुर्डे (आयसीटीसी प्रयोगशाळा तंत्रज्ञ) यांनी विद्यार्थ्यांना आयसीटीसी समुपदेशन केंद्राची कार्यपद्धती, एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, तपासणी सुविधा तसेच विविध उपक्रम व उपलब्ध सेवांची सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमास विद्यार्थी ऋषिकेश निकम, मयुरी पवार, रूपाली बोंबले, कमलेश कदम, रोहित थेटे, रोशन जाधव यांच्यासह रेड रिबन क्लब प्रमुख प्रा. पी. के. संघई, एन.एस.एस. प्रमुख प्रा. पी. बी. महाजन, प्रा. आहिरराव, प्रा. काशिद मॅडम आदी उपस्थित होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्ही/एड्सविषयी जनजागृती निर्माण होऊन प्रतिबंधात्मक उपायांची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्यात आली.

## जिंतुरची लेक माजलगांव नगराध्यक्षपदी विराजमान



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर येथील लेक असलेली शिफा महेरीन चाऊस माजलगांव नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी विजयी झाल्या आहेत. माहेर व सासर या दोन राजकीय घराण्यांच्या नात्याला सत्तेची जोड मिळाली आहे.जिंतुरचे जेष्ठ व्यापारी तहजीब जानीमियाँ यांची नात, माजी नगरसेवक शोएब जानीमियाँ यांची भाच्ची व मोहीत जानीमि याँ यांची कन्या शिफा बिलाल चाऊस यांनी माजलगांव नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी विराजमान होऊन इतिहास रचला. जिंतुरच्या लेकीने सासरच्या भक्कम राजकीय वारसा आपल्या कार्यकर्तृत्वाने पुढे नेल्याने दोन्ही शहरांत आनंदाचे वातावरण आहे. शिफा यांचा विवाह २०१९ मध्ये माजलगाव येथील प्रसिद्ध राजकीय चाऊस कुटुंबात झाला. मोहीत जानीमि याँ यांनी आपल्या कन्येचा विवाह माजलगाव माजी नगराध्यक्ष साहल चाऊस यांचा मुलगा बिलाल सहाल चाऊस यांच्याशी झाला. या विवाहातून जिंतूर आणि माजलगांव या दोन शहरांमधील राजकीय आणि कौटुंबिक स्नेह अधिक घट्ट झाला. माहेरचा राजकीय वारसा आणि सासरचा दांडगा लोकसंग्रह यांच्या जोरावर शिफा यांनी निवडणुकीत घवघवित यश संपादन केले. जिंतुरची लेक आता माजलगाव नगरपरिषद ची विकासाची धुरा सांभाळत असल्याने दोन्ही कुटुंबात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. या विजयाबद्दल तहेजीब जानीमियाँ, नफिस जानीमियाँ, अजीज जानीमियाँ, शेख वाजीद, शे रफीक एकबाल जानीमियाँ ऊर्फ मुन्ना सर, शोएब जानीमियाँ यांनी व जिंतूर करांनी आंनद व्यक्त केला.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## राज्यस्तरीय गीत गायन स्पर्धेत भाग्यश्री नारायण वाकळे प्रथम



**कन्नड (अरुण थोरात):** कळंकी ता.कन्नड येथील गानकोकीळा तथा काशिनाथ पाटील जाधव विद्यालय कन्नड ची विद्यार्थीनी कु. भाग्यश्री नारायण वाकळे हीने राज्यस्तरीय गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याबद्दल तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.कै.कडु पाटील विधाते यांच्या स्मृती प्रित्यर्थ वरद गणेश मंदिर छत्रपती संभाजीनगर येथे राज्यस्तरीय गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात कु.भाग्यश्री नारायण वाकळे हिने सादर केलेल्या 'अबीर गुलाल उधळीत रंग' या गीतास प्रथम क्रमांक मिळाला, तीन हजार रुपये रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कु. भाग्यश्री ने आतापर्यंत अनेक गीत, वकृत्व आदी स्पर्धांत भाग घेऊन सन्मान मिळविले आहे. भाग्यश्री, मराठवाड्या सीमावर्ती अतिशय दुर्गम अशा कळंकी गावातील गुणवान गायिका आहेत. तीचे वडील हभप. नारायण महाराज वाकळे हे ही राज्यातील नामवंत किर्तनकार असून त्यांचा हा वारसा भाग्यश्री पुढे घेऊन जात आहे. याबद्दल तुकाराम पडवळ, रविंद्रबापू थोरात, दिनकर दाभाडे, अरुण थोरात, तातेराव मतसागर, गणेश वाकळे, विजय काटे, मगन थोरात, अर्जुन वाकळे, राहूल थोरात, आदींसह जिजामाता परिवाराचे सचिव सागर जाधव, प्र.आ. सचिन भामरे, मुख्याध्यापक दत्तात्रय गायके, आदींनी अभिनंदन केले आहे.चौकट_कु. भाग्यश्री आमच्या गावातील एक कोहिनूर हिरा आहे. अतिशय दुर्गम असलेले आमचे गाव सर्व भौतिक सुविधां पासून वंचीत आहे. अशा परिस्थितीत भाग्यश्री चे वडील हभप. वाकळे महाराज आपल्या मुलांसह गावातील मुलांना अध्यात्मिक शिक्षणा बरोबरच त्यांच्या कलागुणांना जागृत करीत एक आदर्श संस्कारक्षम नवी पीढी घडवित आहे. त्यामुळेच भाग्यश्री सारख्या अनेक मुली गायन भजन किर्तन शिक्षण क्षेत्रात चमकत आहे. भाग्यश्री ने गावाचे नाव राज्यपातळी वरती नेऊन गावाचा लौकिक वाढविला आहे. तीचा आदर्श घेऊन केवळ मुलींनीच नाही तर, तरुणाईने ही जिद्दीने शिक्षण आणि आपल्याला ज्या क्षेत्राची आवड आहे. त्या क्षेत्रात दमदारपणे मेहनत घेऊन आई वडील आणि गावाचा लौकीक वाढवावा. ही भाग्यश्री सह सर्व तरुणाईला शुभेच्छा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० डिसेंबर २०२५


## अय्युब पठाण यांना राज्यस्तरीय बाल साहित्य पुरस्कार प्रदान




**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** पुणे पुस्तक महोत्सवानिमित्ताने पुणे येथील महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या वतीने नुकतेच २०२५ चा सन्मानाचा व अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार हा " अंगत पंगत " या बाल कवितासंग्रहाला बालसाहित्य पुरस्कार मराठवाडयाचे प्रसिद्ध बालकवी अय्युब पठाण लोहगांवकर यांनां पुणे येथे बालसाहित्य पुरस्कार सोहळ्यात जेष्ठ बालसाहित्यिक तथा पत्रकार श्री. महावीर जोंधळे, आणि पुणेच्या बालभारतीच्या किशोर मासिकचे संपादक किरण इंदू केंद्रे यांच्या हस्ते पुणे येथील बालगंधर्व नाट्यमंदिर येथे प्रमुख पाहुणे तथा जेष्ठ साहित्यिक श्री. ना. म. जोशी यांच्यासमोर बालकवी अय्युब पठाण यांना राज्यस्तरीय पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप आकर्षक स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र, रोख रक्कम असे आहे. यावेळी हिंदी भाषा प्रचार समितीचे सर्व पदाधिकारी पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमास उपस्थित होते." अंगत पंगत " या बाल कवितासंग्रहाला हा सलग राज्यस्तरीय चौथा पुरस्कार आहे. " अंगत पंगत " या बालकवितासंग्रहात बालकांचा भावाविश्वाचा आनंद प्रतीत होतो. कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या " अंगत पंगत " या बालकवितासंग्रहातील कविता ह्या वाचकाच्या तथा बालकांच्या ऱ्हदयाच्या ठाव घेणाऱ्या असून त्यात आशयघन व दर्जेदार कवितांचा समावेश आहे. तसेच त्या कवितामध्ये वास्तववादी जगण्याचे तत्वज्ञान व मनोरंजनातून बालकांचे प्रबोधन केले आहे. " अंगत पंगत " या बालकवितासंग्रहाला हा राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार मिळाल्याने अय्युब पठाण लोहगांवकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## सुप्रसिद्ध-समीक्षक, अनुवादक डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांचा 'मातीला पंख फुटताना' या कादंबरीवरील सुंदर अभिप्राय

**डॉ** स्मिता पाटील यांची अलीकडे प्रकाशित झालेली लघु कादंबरी "'मातीला पंख फुटताना" वाचताना एका गोष्टीची तीव्र जाणीव झाली की या लेखिकेकडे ग्रामीण भागातील जीवनाच्या अनुभवाचा विलक्षण असा खजाना आहे. आणि ते सादर करण्याची त्यांची स्वतःची अशी वेगळी आणि खूप आकर्षक अशी पद्धत आहे. भारतीय साहित्य परंपरेत अलंकार संप्रदायात स्वभावोक्ति नावाचा एक अलंकार आहे जे कोणत्याही कवी लेखकासाठी फार मोठे आव्हान आहे. या अलंकारात वस्तु,व्यक्ती,घटना यांचे वर्णन ते जसे आहे तसेच वर्णन करायचे असते.आणि हे खूप अवघड असते . कुठल्याही प्रकारचा योगायोग किंवा नाट्यात्मकता येथे अपेक्षित नाही.आहे त्या स्थितीचे पात्रांच्याच भाषेत अभिव्यक्ति करायची.लेखकासाठी हे फार मोठे आव्हानात्मक कार्य असते.लेखिकेने हे आव्हान सहजपणे पेलले आहे. या कादंबरीत ग्रामीण भागातील मुलीचे भाव विश्व उलगडत जाण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. केवळ 122 पानाच्या कादंबरीत संपूर्ण ग्रामीण जीवन आणि तेथे जगणाऱ्यांचे भाव विश्व व्यक्त झालेले आहे. एकाच घरात तीन पिढ्या जगत आहेत.कादंबरीच्या केंद्रस्थानी गौरा नावाची किशोर वयातील मुलगी आहे. गौराची आजी पहिल्या पिढीतील, काका-काकू, आई आणि वडील दुसऱ्या पिढीतील आणि गौरा, तायडी व भावड्या हे तिसऱ्या पिढीतील अशा तीन पिढ्या एकाच घरांत जगत आहेत. पैकी पहिली पिढी ही परंपरेने आलेल्या मूल्यांना किंवा कर्मकांडाना खूप महत्त्व देत असते. ही पहिली पिढी पुरुष सत्ताक व्यवस्थेशी बांधिल आहे. या पहिल्या पिढीतील स्त्रियांचे जीवनाविषयक दृष्टिकोण हे पुरुषसत्ताक व्यवस्थेने तयार केलेले आहेत. आणि त्यामुळेच मुलगी बारा-तेरा वर्षाची झाली की तिच्या लग्नासाठी आजी आग्रह धरते. पहिल्या पिढीतील या दृष्टिकोणाचा प्रभाव दुसऱ्या पिढीतील काका आणि काकू वर जास्त आहे. त्यामानाने गौराच्या वडिलावर त्याचा कमी प्रभाव आहे. गौराचे वडील एकाच वेळी वर्तमान आणि भूतकाळ दोन्हीत समन्वय साधण्याचा प्रयत्न करीत असतात. ही जी तिसरी पिढी आहे याचे प्रतिनिधीत्व गौरा, लक्ष्मी, तायडी ,भाबड्या, शिरप्या ,अर्चना, निशा ,प्रशांत करीत आहेत. ही पिढीच या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे.या पिढीच्या भाव विश्वाला व्यक्त करण्याचा प्रामाणिक प्रयत्न लेखिकेने केलेला आहे. या तिसऱ्या पिढीतील भावविश्व परस्पर विरोधी आहे. स्वतंत्रपणे निर्णय घेणारी, स्वतःच्या अस्मितेला जपणारी आणि आपल्या स्वप्नांना साकार करण्यासाठी झटपटणारी मुलगी गौरा येथे आहे. लक्ष्मीत देखील थोडे बहुत ही लक्षणे आहेत पण ती घरच्या मंडळी समोर पूर्णपणे पराभूत आहे. तायडी बुद्धिमान आहे, तिला खूप शिकायची इच्छा आहे पण ती घरच्या मंडळी समोर पराभूत आहे.त्यामुळे तिचे लग्न करण्यात येते.हीच स्थिती लक्ष्मीची होते. भाबड्या आणि शिरप्या तिसऱ्या पिढीतील पुरुष व्यवस्थेचे प्रतिनिचेत्व करतात. पैकी भाबड्या हा शेतात रमणारा आणि भविष्याबद्दल कुठलीही आकांक्षा न ठेवता केवळ वर्तमानात जगणारा आहे. त्याचे भूतकाळाशी घेणे देणे नाही आणि भविष्य काळाची चिंता करणे याची गरज त्याला वाटत नाही. शिरप्या आजच्या त्या तरुणांचे प्रतीक आहे जे आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी विकृत मार्गाचा वापर करतात. हा स्वच्छंदपणे जीवन जगणारा मुलगा आहे तर त्याचवेळी प्रशांत नावाचा दुसरा मुलगा हा खूपच भाबडा रोमांटिक व व भविष्याबद्दल कसलीही तयारी न ठेवता लग्न करण्याची भाषा करणारा आहे . त्याचे तथाकथित प्रेम हे खूपच रोमांटिक आणि अव्यवहारी आहे. याप्रमाणे या छोट्याशा कादंबरीत या नवीन पिढीच्या वेगवेगळ्या प्रवृत्तींचा परिचय त्यांच्या आचरणातून करून देण्यात आलेला आहे. घरच्या परिस्थिती मुळे पराभूत होणारे, केवळ वर्तमानातच जगणारे, आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी विकृत मार्गाचा वापर करणारे आणि रोमँटिक व प्लेटोनिक प्रेमाची भाषा करणारे-- अशा या वेगवेगळ्या प्रवृत्ती आहेत. विशेष म्हणजे या नव्या पिढीचे भाव विश्व उलगडत असताना लेखिका कुठल्याच प्रकारचा उपदेश करीत नाही. सरळ सरळ त्यांच्या भावविश्वाचे वर्णन करीत नाही तर त्यांच्या आचरणातूनच ते भावविश्व व्यक्त होत जाते. म्हणजे या मुला मुलीबद्दल लेखिका कुठल्याही प्रकारचे निष्कर्ष देत नाही तर ते ज्या पद्धतीने विचार करतात ,ज्या पद्धतीने निर्णय घेतात ते निर्णय, त्या वाचकांसमोरु ठेवतात. त्यातून वाचकांना हे लक्षात येते की आजच्या मुला मुलीत या वेगवेगळ्या प्रवृत्ती काम करीत आहेत. या कादंबरीत केवळ गौराच्या कुटुंबातील प्रश्न व्यक्त झालेले नाहीत तर या निमित्ताने या संपूर्ण गावाचे आणि केवळ या गावाचे नव्हे तर या देशातील तरुण पिढीचे,शेतकऱ्यांचे प्रश्न देखील व्यक्त झालेले आहेत. त्यांच्यातील वेग वेगळ्या प्रवृत्ती ही व्यक्त होत झालेल्या आहेत. हे सर्व लेखिकेने त्यांच्या आचरणातून टिपलेले आहे म्हणून त्यांचे अभिनंदन!!! भारतातील ग्रामीण विभागात आजही बालविवाह होत आहेत. या बालविवाहाचे परिणाम किती भयंकर असतात हे लक्ष्मी आणि तायडीचे जीवन पाहिल्यावर लक्षात येते . भारतीय शेतकरी किती वेगवेगळ्या समस्येत अडकलेला आहे हेही यातून दिसून येते. समृद्ध अशी आर्थिक स्थिती असलेले हे कुटुंब हळूहळू ही समृद्धी गमावून बसते आणि त्याला जगणे अवघड होते. आजही भारतीय शेतकरी आपल्या उत्पन्नातील बराचसा भाग लग्नासाठी, मृत्यूनंतरच्या कर्मकांडासाठी खर्च करीत असतो. गावातील आपली प्रतिष्ठा जपण्यासाठी तो वायफळ खर्च करीत असतो.एकूणच कृषी जीवन आणि कृषी जीवनातील कौटुंबिक जीवन याचे अत्यंत यथार्थ असे चित्र लेखिकेने सादर केलेले आहे. या कादंबरीच्या भाषेबद्दल बरेच काही लिहिता येईल. ही भाषा प्रमाण भाषा नाही. केवळ शहरात आणि शहरी भाषेची संबंधित असलेल्यांना ही भाषा कदाचित ग्रामीण आणि अशुद्ध वाटेल. पण या राज्यातील 80 टक्के लोक ज्या भाषिक परंपरेतून आलेले आहेत त्याच भाषेचा वापर येथे झालेला आहे.त्या मुळेच ही कादंबरी खूपच वाचनीय झालेली आहे.लेखिकेने काहीं ठिकाणी शब्दांचा असा काहीं वापर केलेला आहे,की वाचक चक्रावून जातो.उदाहरणार्थ पान 26 वर एका वाक्यात "मस्त वाईट वाटले "असे आले आहे. वाईट वाटणे देखील मस्त असते हा एक विलक्षण अनुभव आहे. कादंबरीतील ग्रामीण भाषा अर्थाच्या दृष्टीने किती समृद्ध आहे याचे अनेक पुरावे देता येतील. विशेषत: ज्यावेळी पहिली पिढी बोलत असते त्यावेळी त्यांच्या भाषेत किती म्हणी येत असतात, कमीत कमी शब्दात ते कितीतरी बोलून जातात हे आपल्याला लक्षात येईल. किशोरावस्थेतील मुला मुलींशी संवाद साधताना लेखिका रोजच्या दैनंदिन जीवनाच्या अनुभवातून त्यांना त्यांच्या समोरच्या प्रश्नाची जाणीव करून देतात. उदाहरणार्थ "शर्टाचे पहिले बटन लावायचे चुकले की पुढचा सगळा क्रम चुकत जातो. तसाच तारुण्यात ही एकदा पाऊल चुकले की पुढचे सगळे आयुष्य चुकत जाते म्हणून आपला अभ्यास हेच प्रत्येक विद्यार्थ्यांचे पहिले प्रेम असणे महत्त्वाचे असते." अशा प्रकारच्या शब्दांच्या वापरामुळे एक वेगळीच मजा ही कादंबरी वाचताना येते. या संपूर्ण कादंबरीत किशोरावस्थातील मुला मुलींच्या भाव विश्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न झालेला आहे. या किशोरावस्थेतील एक मुलगी ,अत्यंत संवेदनशील अशी गौरा ने आपल्या जीवनासंबंधी निर्णय घेत असताना घरच्या परिस्थितीची खूप तीव्र अशी जाणीव ठेवते. शाळेची ट्रिप कोकण येथे निघालेली आहे. गौरा जाण्याची तयारी करीत आहे. पण ज्यावेळी तिला हे लक्षात येते की आपल्या कांद्याला कसलाच भाव आलेला नाही त्यामुळे वडील व्यथित आहेत. घर खर्चासाठी देखील पैसे नाहीत तिथे ट्रीप साठी का म्हणून खर्च करावे म्हणून ती स्वतः निर्णय घेते की मी जाणार नाही. आपल्या कुटुंबा बद्दलची जबाबदारी ओळखणारी पण त्याच वेळी कुटुंबाच्या चुकीच्या कल्पनांना विरोध करणारी आणि आपली अस्मिता आणि आपले ध्येय पूर्ण करण्याच्या धडपडीत कुटुंबातील मंडळी कितीही दुखावली तरी देखील पर्वा न करता आपल्या ध्येयपूर्तीसाठी म्हणून ती आपली बहीण तायडीच्या मदतीने घर सोडते. पुण्याला येते पण नंतर पुण्यातल्या बाई तिला सुरक्षित घरी आणून सोडतात आणि त्यानंतर घरच्या मंडळीचे मन परिवर्तन होते व ते तिला शिकवायचा निर्णय घेतात. या मुलीची स्थिती सांगत असताना लेखिका शेतकऱ्याच्या अवस्थेकडे देखील तेवढ्याच गांभीर्याने पाहते. पान 63 वर "बँकेचं लोन परवडते पण मागे काढलेले बँकेचे लोन फिटलं नाही आता बँक लोन द्यायची नाही. गेल्या वर्षी गहू चांगला वाढत होता पर त्याच्यावर तांबोरा पडला आणि समदा इस्कुट झाला नाही तर बँकेचे लोन बार झाला असता कांद्यानबी मातीत घातलं. भुईमुगाच्या पैशांना थोडा आधार घावला. आता परत सावकारापुढे हात पसरण्या बिगर पर्याय नाही"शेतकऱ्यांची व्यथा, किशोरावस्थातील मनाची अस्वस्थता, शिक्षणासाठी चाललेली धडपड हे सर्व काही अत्यंत कौशल्याने आणि खूपच प्रभावी अशा भाषेत स्मिता पाटलानी मांडलेले आहे. ही लघुकादंबरी वाचकांना अंतर्मुख करते.त्यांना आत्मपरीक्षणा साठी प्रवृत्त करते. सुंदर मुखपृष्ठासाठी सरदार जाधव यांचे अभिनंदन!!निर्दोष मुद्रण व अप्रतिम अशा छपाई साठी दिलीप राज प्रकाशनाचेही अभिनंदन!!!

**मातीला पंख फुटताना: डॉ. स्मिता पाटील**
**प्रकाशक : दिलीपराज प्रकाशन,पुणें**
**पृष्ठे :** 122, **मूल्य.** ₹ 190/
**संपर्क लेखिका:** 9860932270


**समीक्षा**
**डॉ. सूर्यनारायण रणसुभे,**
**लातूर**
8378080660
**ransubhetoo@gmail.com**



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० डिसेंबर २०२५

# प्रा. रवींद्र कोकरे : वैखरीचा जागर मांडणारे अवलिया




**९९**व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे ३ जानेवारी २०२६रोजी'वैखरीचा जागर'या पुस्तकाचे मान्यवरांच्या शुभहस्ते प्रकाशन होते आहे.क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जन्मस्थळ (नायगाव)ता.खंडाळा जि सातारा येथील प्रा रवींद्र कोकरे.यांचा वैखरीचा प्रवास म्हणजे हे 'रसनेची तत्वतः' जिव्हेच्या वाणीने अवघ्या महाराष्ट्राचा मायाळू गोतावळा निर्माण करणारे शिद्हस्त कथाकार.ग्रामीण साहित्यिक,वक्ता,व्याख्याते,संवादक,मार्गदर्शक,वाणीभूषण, किर्तनकार, उपक्रमशील अध्यापक, प्रवचनकार, प्रबोधनकार, कथाकथनकार, हास्यकल्लोळकार,इ.विवेकी संबोधने प्रा.रवींद्र कोकरे याना मिळत गेली.श्रध्देय व्याख्यानकर्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले यांची शाबासकीची आशीर्वादरुपीथाप मिळाली आहे.या मायामराठी मुलखाची मुसाफिरीम्हणजे पायाला भिंगरी अन् डोक्यात प्रबोधनाची शिदोरी घेऊन ही मुलुख मैदानी तोफ चौफेर 'वैखरीचा जागर'करीत.मायबोलीचा अष्टगंध कपाळी टिळा लावून हे अवलिया महाबळेश्वर,चंद्रपूर, यवतमाळ,घुमान(पंजाब)उदगीर,
दिल्ली,सातारा.अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित कथाकथनकार म्हणून.भन्नाट
सहभाग.छबिना,थापणूक,बंड,इजाळ ही चार ग्रामीण कथासंग्रह.विद्यालयीन व महाविद्यालयीन जीवनात कथाकथानांचे जनक बिल्वपत्र स्व.शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर,द.मा.मिरासदार,व.पू.काळे,
वामन होवाळ,बाबा कदम, प्राचार्य रा.रं.बोराडे, आनंद यादव, प्रतिमा इंगोले, आप्पासाहेब खोत,ना.धों.महानोर,आण्णा हजारे,सिंधूताई सपकाळ यांच्या शुभहस्ते सन्मान.तर महाराष्ट्राचे नेते पद्मश्री शरदराव पवार यांच्या पारखी नजरतून कौतुकाची थाप..हा वैखरीचे जागरणाचा विषय आहे.माय मराठीच्या मुलखात संपुर्ण महाराष्ट्रभर कथाकथन, व्याख्यान, प्रबोधन करीत माय मातीच्या माणसांचा गोतावळा तयार झाला.हे वैखरीचे गणगोत म्हणजे आत्मिक स्वानंद देणारं आहे.यामुळे घरग्रस्तीला मुरड घालून बोलून चालून माय मातीचा अष्टगंध कपाळी टिळा लावून प्रा रवींद्र कोकरे खळाळून नितळ निर्लेप निस्पृह झऱ्यासारखे अभिव्यक्त होतं राहिले.मुक्त व्यक्त होण्यासाठी बोलीभाषेचा लेहजा हा वैखरीचा वैभवशाली वसा वारसा आहे.त्यांच्या कथाकथनातून निस्सीम भक्तीचा ठसा उमटत गेला.तसा समकालीन वास्तवाचा जागल्या होतांना वंचित उपेक्षितांच्या घटकांचा मी अनुयायी आहे.महा पुरुषांच्या आचार विचार आणि प्रचाराचा प्रज्ञावंत अभ्यासू जागर मांडणारे ते व्याख्याते आहे.आसवांचे मोल डोळ्यांना असते.रक्ताचे नाते हे मातृत्वात असते.हेच ब्रीद घेऊन ते नुसते गुदगुल्या करीत नाहीतर त्यांच्या हास्य कथनातून कारुण्य ही मायाळूपणे पाझरते तिथे त्यांच्या दुःखाची सल उजागर होते.हाच कनवाळू धागा रसिकांच्या मनाचा होतो.मोचकं बोलावं पण कुचकं बोलू नये!या युक्तीचा प्रत्येय येतो.मग ते मागत जातात "वाणीचा जोगवा" मुक्यांची वेदना काय असेल?तो देहबोलीनें बोलतो.इथं आईच्या उदरातून आल्यावर ईश्वरी अंश म्हणजेच बोबडे बोलने दिले.कथा जन्मापासून मृत्यूपर्यंत थांबत नाही.या समकालीन माणसाच्या वर्मावर तिरकसपणे मार्मिकतेने मर्मग्राही भाष्य करणे ही प्रा.रवींद्रकोकरे सरांची खासियत.इथे अनेक प्रश्नाचे आग्यामोहळ उठलेले आहे.जसे स्त्री भ्रूणहत्या,देवदासी, बालविवाह, हुंडाबळी यावर चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक कथा.'मास्तरला किती पगार यापेक्षा किती विद्यार्थी गुरुजी म्हणून ओळख देतात' "जुन्यात चमकेल नव्यात झळकेलं"या आत्मानुभूती त्यांच्या वक्तृत्व कलेची शिदोरी आहे.'बोले तसा चाले त्याची वंदावी पाऊले'या संत युक्तीचा प्रत्येय आहेच.देवा झिंजाड याचे लक्षवेधी उदा.ते देतात "तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात अंतर पडू देऊ नका" हेच खरे.महा पुरुषांच्या जंयती पुण्यतिथी,सण उत्साहाच्या निमित्ताने त्यांनी आग्रही जनांसाठी लोकप्रबोधन, समाजप्रबोधन करणारे ते वारकरी संप्रदायी साहित्य कथाकथनकार आहेत.जेष्ट साहित्यिक उत्तम कांबळे यांनी 'हास्यकल्लोळकार' ही गौरव उपाधी दिली आहे.आमचं मस्त चाललंय,'तरूणाईचे सावरकर'यात डॉ बाबासाहेब आंबेडकर व सावरकर यांच्या विचारांची बांधिलकी एकच होती.मराठी भाषेचा शब्दकोश सावरकरांनी अद्ययावत केला.यातून प्रा.रवींद्र कोकरे सरांची अभ्यासक सृजनशील चिंतन मंथन दिसून येते.'भटक्यांची शाळा' शाळाबाह्य वंचित भटक्या विमुक्तांच्या मुलांची वेदना मुखर केली आहे गुरगुरण्यात समाजहित असले पाहिजे.या भटक्या विमुक्तांची गणना करून मुख्य प्रवाहात आणले पाहिजे.ही विचारांची सत्यनिवेशी बांधिलकी या लेखातून आलेली आहे.'घराच घरपण' त्याचं होऊ देऊ नका सरपण."हम दो हमारे दो!मा बाप को फेक दो!ही नात्यांच्या नाळेची ताटातूट झाली आहे.वासूदेव -मुलाला वाचवण्यासाठी,तोंडात पाणी गेलं तरी लेकरू वाचलं पाहिजे.श्रावणबाळाचा बाप.पाण्याचा थेंब ही न घेता देह त्यागतो.राजा दशरथ-पुत्र वियोगने व्याकुळ होतो.हे सारे नातेसंबंधऋणानुबंध राहिले नाहीत.'हास्यकारंजी' खरंच भाग्यवंत आहे.साताऱ्याचा तारा,साहित्यिक यशवंतराव चव्हाण."बुगडी माझी सांडली ग जाता साताऱ्याला"अशा सहृदय मनोरंजन करणारं हे बोल कौतुक.तर 'आपले आरोग्य'अहम.मी कोण?अष्टमी,कष्टमी होऊ द्या.श्वास संपला की प्रेत,वाचा गेली की,मुकेपण जीवघेणे होऊन जाते. "प्रेम म्हणजे भिल्ला सारखं,बानावरती खोचलेलं माती मध्ये उगवून सुध्दा, मेघा मध्ये पोहचलेलं""शिक्षण हा शहाणपणा',"टणाने मिळते ते फलटण.चांगल्या कर्माचे फळ टणाने मिळते" वैखरीचा जागर याला एक ललितबंधांची ठेवून आली आहे.व्याख्याते म्हणून आजचीवास्तविक स्थिती गतीवर भाष्य करीत विचारांची पखरण करीत हे लेखन संस्काराचे अक्षर मोती झाले आहेत.म्हणीसुविचार,कविता व आध्यात्म विचारांची, पौराणिक ऐतिहासिक कथांची दाखले देतं मनाची मनभरणी केली आहे.हा वैखरीचा जागर म्हणजे मनोरंजनातून समाज प्रबोधन.'कर्माचा राम राम'.ध्वज म्हणजे राम तो उंचीवर तो वर नेणारी काठी म्हणजे लक्ष्मण.बाळुमामांचे सत्कर्म.आजच्या खऱ्या हिरकणी,शिव जयंती उत्साहाचे स्वरुप., सेवावृत्तीची अहिल्याबाई, नातं जीवाभावाचं,या विषयावर "धनाचा आगर असलेला, कणभर देणगी मागितली की,मनभर देणारा 'धनगर',कन्या हेच दानं,समाज सुधारक बाळू मामा, संगत तशी पतंग,माणुस रुपा पेक्षा गुणाने सुंदर असावा.सीता,अहिल्या,जीजाऊ,सावित्री,
रमाई भीमाई,राणी लक्ष्मीबाई या तावून सुलाखून निघाल्या.'संविधान हेच धन' डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखणीचा महामंत्र सांगितला आहे.'महात्मा हाच आमचा आत्मा 'क्रांतीबांच्या विचारांची सत्यनिवेशी देणगी."जो पर्यंत जात कृतीतून जात नाही.तो पर्यंत समाजाची प्रगती नाही.माळी होते म्हणून ते माळी जपणं बसले नाही.ही विचारांची खोली या वैखरीत आहे.'फकीरा"कर्म हेच स्वामी समर्थ', "काटकोन,षष्टकोन,विशालकोन या पेक्षा दृष्टीकोन हा महत्त्वाचा आहे" 'माती माय' "माती जपा नाती आपोआप जपली जातील" 'वक्तृत्व कला हेच जीवन' 'नात्याची वीण रुजवा' "माझ्या मराठीचे बोल कौतूके, अमृता ते ही पैजा जिंके,ऐशी अक्षरे रसिके मेळवीन" मराठी भाषा दिनानिमित्त हे प्रबोधन.'शतकी वटवृक्ष'हे व्यक्ती व्याख्यान मनोज्ञ दर्शन आहे."माणसं झपाट्याने बदलली.चिमणीला अजूनही घरटं बदलता आलं नाही"'भरकटलेली तरुणाई','संतती हीच संपत्ती' "जो पर्यंत मंदिराच्या रांगा कमी होतं नाही आणि वाचनालयाच्या रांगा वाढतं नाही तोपर्यंत सुधारणा नाही" 'रूप की गुण श्रेष्ठ','रयतेचे रक्षक राजे उमाजी' या रणसंग्रामी धुरंधर 'उमाजी नाईक' विषयावर अतिशय धारदार विचारांचे व्याख्यान चिंतन आशय देऊन जाते.ऐकून'तीस' लेखनविचारांचे वैखरी जागर बोलीभाषेचा रांगडा बाणा घेऊनआपल्या सृजनशील वाणीने अवघ्या महाराष्ट्राचा मायाळू बटवा प्रा रवींद्र कोकरे यांनी कमवला आहे. हे ऋणानुबंधांचेअनुबंध म्हणजे ऋणाई व्यक्त करणारी अभिव्यक्ती. वैखरीचा जागर.

**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके.**
**जालना**
**संपर्क:-९९७५१३७३३७**

# लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेची दशकपूर्ती वाटचाल...!



**लो**कनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार, औद्योगिक क्षेत्रात महत्वपूर्ण असे योगदान होते. मराठवाड्याच्या अस्मितेसाठी व विकासाची भूमिका घेऊन त्यांनी संघर्ष केला. अनेक नेते, कार्यकर्ते घडविले. मा. साहेबांनी विविध क्षेत्रात संस्थात्मक काम ऊभे केले. अनेकांना नोकऱ्या मिळवून दिल्या. मा. साहेब हे ग्रंथप्रेमी व वाचन प्रेमी होते. त्यांचे वाचन उत्तम होते. अनेक ग्रंथ त्यांच्या संग्रही होते. त्यांचे वक्तृत्व ही अतिशय प्रभावी होते. लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांचे पुण्यस्मरण व्हावे, त्यांचे जीवन व कार्य नव्या पिढीसमोर जावेत, उत्तमोत्तम वक्ते तयार व्हावेत, विद्यार्थी वक्त्यांना हक्काचे मोठे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने कन्नड येथील आमच्या शिवाजी महाविद्यालयात मराठी विभागाच्या पुढाकाराने दहा वर्षापूर्वी (२०१५ - २०१६ )लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा सुरू करण्यात आली. पहाता पहाता ही स्पर्धा दशकपूर्तीकडे वाटचाल करते आहे. स्पर्धेचे हे दहावे वर्ष आहे. एखादा उपक्रम सुरू करावा, तो सातत्यपूर्ण पणे निरंतर सुरू रहावा हा आनंद काही वेगळाच असतो. मराठी विभागाने महाविद्यालयात व कन्नड तालुक्यात अनेक वाङ्मयीन, सामाजिक उपक्रम सुरू केले. त्यापैकीच हा एक उपक्रम आहे. या उपक्रमासाठी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. मानसिंहजी पवार साहेब , मा. प्राचार्य डॉ. विजय भोसले सर आणि सर्व सन्माननिय संस्था पदाधिकारी, उपप्राचार्य, प्राध्यापक , प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या वकृत्व स्पर्धेत आजपर्यंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विविध महाविद्यालयीन स्पर्धक सहभागी झालेले आहेत. अनेक प्रतिभावंत युवा वक्ते या स्पर्धेतून घडले, नावारूपास आले. हे वक्ते आज विविध क्षेत्रात आपले महत्वपूर्ण योगदान देत आहेत. वर्षभरातील वर्तमान विषयाची या स्पर्धेसाठी निवड केली जाते. उद्देश एकच की त्या विषयाचे विद्यार्थ्यांना आकलन व्हावे, व्यापक विचार मंथन होऊन त्यांना सामाजिक भान यावे तो अधिकाधिक सजग होऊन विवेकी व मानवतावादी नागरिक घडावा या उद्देशाने विषयाची निवड केली जाते. आजपर्यंत, समाजाशी निगडित वर्तमान सामाजिक प्रश्न चर्चेतील विषयावर विद्यार्थ्यांनी आपली मते प्रभावीपणे मांडली आहे. पुरोगामी महाराष्ट्राला फार मोठा सामाजिक व वैचारिक आशय या स्पर्धेने प्राप्त करून दिला आहे. उदघाटन व समारोप समारंभासाठी आजपर्यंत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचा यथोचित असा सन्मान केला आहे. महाराष्ट्रात या स्पर्धेने अल्पावधीतच आपला एक स्वतंत्र ठसा निर्माण करून अस्तित्व सिद्ध केले आहे . अतिशय पारदर्शकता आणि काटेकोर नियोजन व नेमके आयोजन यामुळे ही स्पर्धा सर्वांना आपली वाटते. लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या कार्यकर्तृत्वाला कृतिशील अभिवादन व्हावे, हा या स्पर्धेचा आणखी एक विशेष आहे. लोकनेत्यांच्या पावन स्मृतिस अभिवादन करणारी ही स्पर्धा अखंडपणे सुरू राहिल यात काही संदेह नाही. अगदी कोरोना काळात ही सर्व नियम पाळून ही स्पर्धा संपन्न झाली होती. या स्पर्धेचे महाविद्यालयीन विद्यार्थी आवर्जून वाट पहात असतात. हे या वक्तृत्व स्पर्धेचे यश आहे. हे वर्ष या स्पर्धेचे दशकपूर्ती वर्ष आहे. या वर्षी आजचे सामाजिक वास्तव आणि युवक हा विषय निश्चित केलेला आहे. या स्पर्धेचे उदघाटन दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वा. मा. अपराजिता अग्निहोत्री ( उपविभागीय पोलीस अधिकारी कन्नड ) यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. अध्यक्षस्थानी डॉ. भिमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. डॉ. ए.के. महाले हे राहणार आहेत. यावेळी संस्थेचे पदाधिकारी मा. कृष्णा पा. निकम, मा. लक्ष्मणराव देशमुख , संस्थेचे संचालक मा. विशाल आहेर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तर सायंकाळी ५ वा. समारोप व पारितोषीक वितरण समारंभ ज्येष्ठ साहित्यिक मा. प्रा. विजय पाथ्रीकर यांच्या उपस्थितीत व संस्थेचे अध्यक्ष मा. मानसिंहजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय अधिकारी कन्नड मा. सतोष गोरड, प्रभारी तहसिलदार मा. दिलीप कुमार सोनवणे , संस्थेचे सचिव मा. चंद्रकांतराव देशमुख, उपाध्यक्ष मा. डॉ. पी. के. निकम, कोषाध्यक्ष मा. बाबासाहेब मोहिते यांची उपस्थिती लाभणार आहे. या वर्षीही या राज्यस्तरीय लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी वक्ते सहभागी होऊन आपले विचार मांडणार आहेत. या स्पर्धेची दशकपूर्ती या वर्षी होत आहे. हा एक आमच्यासाठी ऐतिहासिक असा क्षण आहे. या स्पर्धेचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन मोठया संख्येनी सहभाग नोंदवावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने मा. प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. शिवाजी हुसे, प्रा. डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले आहे. नव वर्षाच्या पूर्व दिवशी संपन्न होणाऱ्या या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेची ओढ व उत्सुकता सर्वांनाच आहे. स्पर्धेची अंतिम तयारी पूर्ण झाली असून ३० डिसेंबर रोजी ही स्पर्धा संपन्न होणार आहे. लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या दशकपूर्तीच्या मी आपणा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा देतो !या ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार होण्यासाठी आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत !-

**प्रा. डॉ. शिवाजी हुसे मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० डिसेंबर २०२५


# राष्ट्रीय संकल्प नियोजन दिनाचे समाजशास्त्रीय

**द**रवर्षी ३० डिसेंबर रोजी साजरा होणारा ‘राष्ट्रीय संकल्प नियोजन दिवस’ हा केवळ वैयक्तिक उद्दिष्टे ठरवण्यापुरता मर्यादित नसून, तो समाजाच्या एकूण वाटचालीचा आत्मपरीक्षणाचा आणि पुनर्नियोजनाचा दिवस आहे. वर्षाच्या शेवटी उभे राहून मागील काळाचा आढावा घेणे, आपल्या यश-अपयशांचे प्रामाणिक मूल्यमापन करणे आणि येणाऱ्या काळासाठी ठोस, वास्तववादी व सामाजिकदृष्ट्या उपयुक्त संकल्प ठरवणे, ही या दिवसाची खरी प्रेरणा आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, संकल्प नियोजन ही प्रक्रिया व्यक्ती आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध अधिक दृढ करणारी आहे. व्यक्तीचे संकल्प हे वैयक्तिक असले तरी त्यांचे परिणाम कुटुंब, समुदाय, संस्था आणि अखेरीस संपूर्ण समाजावर उमटत असतात.मानवी जीवन हे केवळ प्रवाहासोबत वाहत जाण्याचे नाव नाही; तर ते जाणीवपूर्वक दिशा देण्याची कला आहे. ही दिशा देण्यासाठी संकल्प आवश्यक असतात. समाजशास्त्र सांगते की, कोणताही समाज प्रगतीच्या दिशेने तेव्हाच वाटचाल करतो, जेव्हा त्या समाजातील बहुसंख्य व्यक्तींच्या ध्येयांमध्ये सुसंगती असते. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा त्या सुसंगतीचा विचार करण्याची संधी देतो. वैयक्तिक संकल्प आणि सामाजिक गरजा यांचा समन्वय साधला गेला, तर संकल्प हे केवळ शब्द न राहता सामाजिक परिवर्तनाची साधने बनतात.आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि ताणतणावपूर्ण जीवनात अनेकदा संकल्प क्षणिक भावनेतून घेतले जातात. वर्षाच्या सुरुवातीला उत्साहाने ठरवलेले संकल्प काही आठवड्यांतच विसरले जातात. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की, संकल्प अपयशी ठरण्यामागे केवळ इच्छाशक्तीचा अभाव नसतो, तर सामाजिक-सांस्कृतिक अडथळे, आर्थिक मर्यादा, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि संस्थात्मक दबाव यांचाही मोठा वाटा असतो. त्यामुळे राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा केवळ “काय ठरवायचे?” एवढाच प्रश्न विचारत नाही, तर “कसे ठरवायचे?”, “कोणत्या परिस्थितीत ठरवायचे?” आणि “त्या संकल्पांची अंमलबजावणी कशी करायची?” याचाही सखोल विचार करायला भाग पाडतो.संकल्प नियोजन ही मूलतः सामाजिक प्रक्रिया आहे. व्यक्ती आपल्या अनुभवांमधून, सामाजिक संवादातून आणि सांस्कृतिक मूल्यांमधून संकल्प घडवत असते. उदाहरणार्थ, शिक्षण घेण्याचा संकल्प हा केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नसून तो कुटुंबाच्या सामाजिक प्रतिष्ठेशी, रोजगाराच्या संधींशी आणि राष्ट्राच्या मानवी भांडवलाशी जोडलेला असतो. त्याचप्रमाणे आरोग्य जपण्याचा संकल्प हा केवळ स्वतःपुरता मर्यादित न राहता, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील ताण कमी करणारा ठरतो. त्यामुळे संकल्प नियोजन करताना ‘मी’च्या पलीकडे जाऊन ‘आपण’चा विचार करणे ही काळाची गरज आहे.भारतीय समाजरचनेत संकल्पांची परंपरा प्राचीन काळापासून आढळते. व्रत, प्रतिज्ञा, संकल्पना यांचा उल्लेख धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. मात्र आधुनिक काळात या संकल्पांना वैज्ञानिक नियोजनाची जोड देणे आवश्यक झाले आहे. समाजशास्त्र हे सांगते की, कोणताही संकल्प टिकून राहण्यासाठी तो वास्तववादी असणे, सामाजिक समर्थन मिळणे आणि त्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा या तीनही घटकांचा समतोल साधण्याची प्रेरणा देतो.आज भारतासमोर असंख्य सामाजिक आव्हाने उभी आहेत, दारिद्र्य, बेरोजगारी, शिक्षणातील विषमता, लैंगिक असमानता, पर्यावरणीय ऱ्हास, आरोग्य समस्या, सामाजिक तणाव इत्यादी. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय संकल्प नियोजन दिनाचे महत्त्व अधिकच वाढते. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या वैयक्तिक संकल्पांमध्ये सामाजिक जबाबदारीचा समावेश केला, तर सूक्ष्म पातळीवर होणारे बदल व्यापक सामाजिक परिवर्तनाला चालना देऊ शकतात. उदाहरणार्थ, पर्यावरण संवर्धनाचा संकल्प घेणारी व्यक्ती केवळ स्वतःसाठी नाही, तर पुढील पिढ्यांसाठीही शाश्वत भवितव्य घडवण्यास हातभार लावत असते.संकल्प नियोजन हे केवळ उद्दिष्ट ठरवण्यापुरते मर्यादित नसून, ते आत्मशिस्त, सातत्य आणि सामूहिक सहभाग यांची मागणी करते. समाजशास्त्रीय अभ्यासानुसार, ज्या समाजात सामूहिक संकल्पांची संस्कृती बळकट असते, त्या समाजात सामाजिक ऐक्य आणि सहकार्य अधिक दृढ असते. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा अशा सामूहिक संकल्पांची बीजे रोवण्याचा दिवस ठरू शकतो. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि माध्यमे यांनी या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करून समाजात सकारात्मक चर्चेला चालना दिली, तर संकल्प नियोजन ही केवळ वैयक्तिक कृती न राहता सामाजिक चळवळ बनू शकते.आजच्या डिजिटल युगात संकल्प नियोजनाला नवे परिमाण प्राप्त झाले आहे. सोशल मीडिया, ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स आणि डिजिटल साधनांच्या माध्यमातून लोक आपले संकल्प जाहीर करतात, त्यांची प्रगती शेअर करतात आणि इतरांकडून प्रेरणा घेतात. मात्र समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, या प्रक्रियेत दिखाऊपणा आणि वास्तव यातील फरक ओळखणे आवश्यक ठरते. संकल्प हे ‘दाखवण्यासाठी’ नव्हे, तर ‘जगण्यासाठी’ असावेत, ही जाणीव राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन अधोरेखित करतो.संकल्प अपयशी ठरणे हीही सामाजिक शिकवण असू शकते. अपयशातून शिकणे, आपल्या मर्यादा ओळखणे आणि नव्या पद्धतीने प्रयत्न करणे, ही प्रक्रिया व्यक्तीला अधिक प्रगल्भ बनवते. समाजशास्त्र सांगते की, अपयशाला कलंक न मानता शिकण्याची संधी मानणारा समाज अधिक सर्जनशील आणि प्रगतिशील असतो. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा अशा सकारात्मक दृष्टिकोनाचा प्रसार करण्याची संधी देतो.शेवटी, राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव नसून, तो वर्षभरासाठीचा मार्गदर्शक ठरायला हवा. संकल्प म्हणजे भविष्यासाठी टाकलेले पाऊल असते आणि ते पाऊल योग्य दिशेने पडावे यासाठी नियोजन, समन्वय आणि सामाजिक भान आवश्यक असते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, व्यक्तीचे संकल्प जेव्हा सामाजिक हिताशी जोडले जातात, तेव्हाच त्यांचे खरे मूल्य प्रकट होते. म्हणूनच ३० डिसेंबर हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षणाची, पुनर्विचाराची आणि नव्या आशेने पुढे जाण्याची प्रेरणा देणारा ठरतो.आजच्या बदलत्या काळात, जेव्हा अनिश्चितता आणि अस्थिरता वाढलेली आहे, तेव्हा संकल्प नियोजन हीच स्थैर्याची किल्ली ठरू शकते. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन आपल्याला हेच सांगतो की, भविष्य हे आपोआप घडत नाही; ते घडवावे लागते, जाणीवपूर्वक, नियोजनपूर्वक आणि सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून. अशा संकल्पशील समाजातूनच सुदृढ, समतावादी आणि प्रगत राष्ट्राची निर्मिती होऊ शकते.




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),

bagate.rajendra5@gmail.com


# संस्कार, कला आणि देशभक्तीचा संगम; कस्तुरबा इंग्लिश स्कूलचा स्नेहसंमेलन सोहळा यशस्वी



**चापानेर :** येथील श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले वार्षिक स्नेहसंमेलन २०२५ अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व सांस्कृतिक वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्यात आत्मविश्वास, संघभावना व सामाजिक जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने आयोजित या स्नेहसंमेलनात विविध कलाप्रकारांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात मंगलमय वातावरणात श्री गणेश वंदनेने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यनाटिका, समूह नृत्य, भावगीत, देशभक्तीपर गीत, आदिवासी नृत्य, शिवतांडव, लावणी तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या नाट्यछटांनी उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. ‘जिते है जंग’, ‘आर्मी साँग’, ‘सोशल मीडिया’, ‘स्कूल नही जाना है’ यांसारख्या सादरीकरणांतून विद्यार्थ्यांनी आजच्या समाजातील विविध विषय प्रभावीपणे मांडले.कार्यक्रमातील देशभक्तीपर सादरीकरणे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता होताना सभागृहात राष्ट्रप्रेम, शौर्य व संस्कारांची भावना दाटून आली. प्रत्येक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, तालबद्धता, शिस्त व मेहनतीचे दर्शन घडले.या स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी श्री किशोर पवार उपस्थित होते . कार्यक्रमाचे उद्घाटन श्री कल्याण आप्पा पवार यांच्या शुभहस्ते झाले. प्रमुख उपस्थितीत स्वामी विवेकानंद संस्थेचे अध्यक्ष श्री रत्नाकर फाळके सर, आर. जी. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री विकास जिवरख, प्रशासकीय अधिकारी राजेंद्र जिवरख , डॉ. आदिती पाटील, डॉ. ऐश्वर्या घुले यांच्यासह सुप्रसिद्ध कवी ज्ञानेश्वर गायके, प्रवीण दाभाडे, लक्ष्मण वाढले, सुरेश आवटे , श्री अशोक डुक्कर. याशिवाय विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षणप्रेमी नागरिक व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. सुरुवातीला संस्थेतर्फे अध्यक्ष दशरथ सोमासे सर, संचालक अर्जुन सोमासे, केतन पवार ,ओम सोमासे त्यांनी मान्यवरांचा शाल श्रीफळ व श्रीमद् भगवद्गीता देऊन सत्कार केला. शाळा केवळ शैक्षणिक ज्ञान देत नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त, मूल्ये आणि सामाजिक भान निर्माण करण्याचे कार्य करते, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन प्राचार्य सौ. कौशल्या सोमासे, यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप वाकडे, वर्षा जाधव, भारती पवार, मनिषा पवार, आकांक्षा वैष्णव,दुर्गा वैष्णव, अभिलाषा वारखिंडे, दिव्या लोखंडे,पूजा लोखंडे , कृष्णा सोमासे, शिवराज सोमासे, साईराज सोमासे, सायली सोमासे ,कविता हिरे, अंकुश राठोड,राजू राठोड आदींनी परिश्रम घेतले नागरिकांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले.या यशस्वी स्नेहसंमेलनामुळे श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना नवे व्यासपीठ मिळाले असून शाळेच्या सांस्कृतिक परंपरेत या कार्यक्रमाने मानाचा ठसा उमटविला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप वाकडे यांनी केले तर आभार प्रदर्शन साईराज सोमासे यांनी केले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० डिसेंबर २०२५

# भारतीयांनी संविधानास धर्मग्रंथ म्हणून स्वीकारल्यास

वरील विषय घेऊन आपण आत्मचिंतन करण्याचा प्रयत्न करणार आहोत.भारत देश स्वतंत्र झाला.तेव्हा कोणती मुल्य,कोणता विचार घेऊन हा देश पुढे चालणारं,याचा देशवाशीयांनी खूप विचार अभ्यास तर्क वितर्क शोधून भारतीय संविधान निर्माण करण्यासाठी एक समिती निर्माण केली.जगातल्या अनेक राज्यघटनेचा अभ्यास करून महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सार्वभौम जनकल्याणचं भारतीय संविधान देशाप्रती अर्पण केलं.आणि भारत देशांनी ते स्वीकारलं.देशामध्ये अनेक धर्म,रिती, रिवाज चाली रीती, संस्कृती,विचार,भाषाआहेत त्या प्रत्येक विचाराला स्वीकारलं.जाती आणि त्यांच्या परंपरेला स्वीकारलं.मानवी मूल्य घेऊन त्याच्या नैतिकतेला स्वीकारलं.सर्व जाती आणि धर्माला समान न्यायाच्या बाजूने स्वीकारलं. शिक्षणाचा अधिकार,निवासाचा अधिकार,प्रॉपर्टी संपादन करण्याचा अधिकार,अनेक अधिकार देऊन इथल्या माणसाला जगण्याचं, विचाराचं,स्वातंत्र्य दिलं.मतदानाचा अधिकार दिला,देश चालवणारा व्यक्ती निवडण्याचा अधिकार दिला. हे सर्व लोकशाही मूल्य अंगीकृत करण्याचा मार्ग मोकळा करून दिला.जगातल्या प्रत्येक धर्माच्या पलीकडे जाऊन भारतीय संविधानाने लोकांना स्वातंत्र्य दिलं.स्वातंत्र्य,समता,न्याय आणि बंधुत्व ही चार मूल्य बहाल केली.याहुनी जगात सर्वात मोठा धर्मग्रंथ नाही. हे ठामपणे सांगावसं वाटतं.जगातल्या अनेक धर्माचा थोडासा जरी अभ्यास केला तरी प्रत्येक धर्मग्रंथ हें पुरुषी अहंकारातून लिहिले गेलेले आहेत.प्रत्येक धर्मग्रंथांमध्ये बाईची उपेक्षा केल्याचे दिसते.कारण नसताना देव नावाचं भूत प्रत्येकाच्या मालगुटीवर बसविल्याचे दिसते.देवाच्या नावाने माणसाच्या मनामध्ये भीती निर्माण करून त्याचं शोषण केल्याचे दिसते.परंतु भारतीय संविधानामध्ये कुठेही अधार्मिकता दिसत नाही.देव आणि दैववाद दिसत नाही.की कोठेही भीती निर्माण केल्याचे दिसत नाही. खरंतर भारतीय संविधान हा पवित्र धर्म ग्रंथ मानायलाच हवा.यातून जातीयभेद कमी होतील.देशामध्ये प्रत्येक मानव जातीमध्ये शहिष्णुता वाढेल.स्त्री पुरुष समानता सांधली जाईल.हिंसाचार,अत्याचार,खून मारामारी,दरोडे,व्यभिचार या सर्व गोष्टीला बाजूला हटवण्यासाठी प्रत्येक माणूस काम करेल.भ्रष्टाचार मुक्त भारत देश होईल.भयमुक्त समाज निर्माण होईल.कारण धर्मग्रंथ म्हटलं की प्रत्येक माणसाच्या मनावरती धार्मिक अधिष्ठान निर्माण होईल.शहिष्णुता निर्माण होईल.देशप्रेम,देशभक्ती हा विचार दृढ होईल.सांघिक विचार, सर्वव्यापी विकास त्याचं वलय निर्माण होईल.आणि त्यातून माणूस वाईट गोष्टी करायला थांबेल. चांगल्या गोष्टीचा स्वीकार करेल. सामाजिक बदलाची मूलतत्त्वे माणसाच्या मनावरती बिंबवली जातील. यातून सर्वांचा विकास सर्वांसोबत विकास.हा विचार पुढे दृढ होईल. भारत देशामधील एक उदाहरण अनुभवाचे झाल्यास,जेव्हा आषाढी विठ्ठल भेटीची वारी सुरू होते.तेंव्हापासून ते वारी समाप्त होईपर्यंत,त्या वारीत महाराष्ट्रातलेच नाही तर जगाच्या पाठीवरचे लाखो लोक एकत्र येतात.तेथे शिवीगाळ होत नाही,भांडण होत नाही, मारामारी होत नाही,कुठलीही हिंसा होत नाही.जात विचारली जात की धर्म विचारला जात नाही. प्रत्येकाच्या मुखामध्ये फक्त माऊली हा शब्द असतो.विठ्ठलाच्या नामघोषामध्ये तो आपला मार्ग क्रमित असतो.लाखो लोक चालत असतात.प्रत्येकाची सोय आपोआप होत असते.तिथे राग,द्वेष,मोह,मद,मत्सर,अहंकार हे षडविकार सर्व गळून पडतात. हे फक्त वारीत घडतं. हे जर विठ्ठलाच्या प्रती प्रत्येक माणसांच्या मनात असलेली सद्भावना येथे अशी निर्माण होते तर तोच विचार भारतीय संविधानाप्रती निर्माण झाल्यास या देशाचा कायापालट व्हायला वेळ लागणार नाही. जगाचं लक्ष या देशाकडे लागलेलं असेल.ही संकल्पना असली तरी ती वास्तवाकडे घेऊन जाणारी आहेचं त्यासाठी प्रत्येक माणसाच्या मनामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होणे आवश्यक आहे. सर्वव्यापी विकासाची मूर्त स्वरूप देण्यासाठी प्रत्येकाच्या मनामध्ये भारतीय संविधान हा धर्मग्रंथ आहे,असे रुजण्यासाठी इथली मलीन झालेली न्यायव्यवस्था,इथली अविचारी धर्म व्यवस्था,इथली भ्रष्ट झालेली नीतिमता,ढासळलेली अर्थव्यवस्था,खुर्चीच्या लालसेपोटी विचार घाण ठेवलेली राज्य व्यवस्था, आणि इथली मूळ शिक्षण व्यवस्था बदलणे अत्यंत आवश्यक आहे.त्यात सुधारणा करणे गरजेचे आहे. एका बाजूला धर्माच्या नावाखाली हजारो धर्मस्थळातील सोन्याचे गाभारे भरलेले आहेत.दुसऱ्या बाजूला प्रचंड भ्रष्टाचाराणे उच्छाद मांडलेला आहे.तर दुसऱ्या बाजूला गरिबीच्या,जातीच्या,धर्माच्या प्रचंड खोलवर दऱ्या विखुरलेल्या आहेत. दोन जाती,दोन धर्म एकमेकांच्या वरती शस्त्र उचलतात.भर दिवसा महिलेची धिंड काढली जाते. राज्यसत्ता आणि न्यायव्यवस्था डोळ्याला पट्टया लावून स्तब्ध राहते. बाघ्याची भूमिका घेत राहते. हे सर्व बदलू शकतो काय?असा प्रश्न समोर आल्यास होय ते शक्य आहे असेचं उत्तर येईल.त्यासाठी शिक्षणामध्ये संविधान हा धर्मग्रन्थ आहे.याची मूलतत्त्वे लहान मुलांना शिकवावी लागतील. बालमलावर संविधानाच्या प्रत्येक कलमाचा जागर करावा लागेल. संविधान शिक्षण हे सर्वांसाठी खुले करावे लागेल.ते विचार आणि कृती आचरणात आणण्यासाठी शिक्षकांना तयार करावं लागेल. शिक्षक जणू धर्म प्रचारक आहेत अशा शिक्षकांची निर्मिती करावी लागेल.कारण नव समाज निर्माण करावयाचा झाल्यास शिक्षण व्यवस्था ही पवित्र असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येकाच्या मनावरती सविधान हा धर्मग्रंथ आहे,असे विचार बिंबविणे अत्यंत आवश्यक आहे.यातूनच नव्या समाजाची निर्मिती होईल. मानवी जीवनाच्या विकासासाठी निर्माण केलेली सर्व नियम, नियमावली,आणि कलमे ही प्रत्येक माणसाने अंगीकृत केल्यास धर्माचे रीती रिवाज आहेत असे गृहीत धरून त्यास स्वीकारल्यास मग हिंसा होणार नाही.अत्याचार होणार नाहीत. प्रॉपर्टी पैसा आणि पदासाठी येथे खून मारामाऱ्या होणार नाहीत.यातूनच मूल धर्माची आचार संहिता म्हणून या संविधानास धर्मग्रंथाचा दर्जा निर्माण होईल. यातून सर्व मानवांच्या जीवांच्या कल्याणाचा मार्ग सुखकर होईल....



**लेखक:- भूमिपुत्र वाघ.**
**सामाजिक कार्यकर्ते**
**उमरगा, जि. धाराशिव**
**मो. 9172972482**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० डिसेंबर २०२५


# घामाने भिजलेली माती काव्यसंग्रहाचे दिमाखदार प्रकाशन संपन्न





**चापानेर/कन्नड :** ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांची व्यथा, कष्टकरी माणसांचे दु:ख आणि मातीशी नातं जपणाऱ्या संवेदनशील कवितांचा संग्रह असलेल्या कवी संदीप नानासाहेब वाकडे लिखित 'घामाने भिजलेली माती' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथे अत्यंत उत्साहात व साहित्यिक वातावरणात संपन्न झाला.शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलन २०२५ निमित्त आयोजित या सोहळ्यास मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री किशोर पवार उपस्थित होते . कार्यक्रमाचे उद्धाटन श्री कल्याण आप्पा पवार यांच्या शुभहस्ते झाले. प्रमुख उपस्थितीत स्वामी विवेकानंद संस्थेचे अध्यक्ष श्री रत्नाकर फाळके सर, आर. जी. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री विकास जिवरख, प्रशासकीय अधिकारी राजेंद्र जिवरख, डॉ. आदिती पाटील, डॉ. ऐश्वर्या घुले यांच्यासह सुप्रसिद्ध कवी ज्ञानेश्वर गायके, प्रवीण दाभाडे, लक्ष्मण वाढले, सुरेश आवटे , श्री अशोक दूधकर. याशिवाय विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षणप्रेमी नागरिक व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता या वेळी बोलताना मान्यवरांनी 'घामाने भिजलेली माती' हा काव्यसंग्रह म्हणजे शेतकरी जीवनाचा आरसा असून ग्रामीण वास्तव मांडणाऱ्या कविता समाजाला संवेदनशील बनवतात, असे मत व्यक्त केले. ग्रामीण साहित्याला चालना देणाऱ्या अशा प्रयत्नांचे कौतुक करत त्यांनी कवी संदीप वाकडे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामीण जीवनावर आधारित कविता आजच्या पिढीला मातीशी जोडून ठेवण्याचे काम करतात, असे त्यांनी नमूद केले.कवी संदीप नानासाहेब वाकडे हे मूळचे शेतकरी कुटुंबातून आले असून, स्वतःच्या अनुभवांतून त्यांनी या काव्यसंग्रहाची निर्मिती केली आहे. शेतात घाम गाळणारा शेतकरी, निसर्गाची अवहेलना, दुष्काळ, आशा-निराशा, कुटुंबाची जबाबदारी अशा विविध विषयांवर आधारित कविता या संग्रहात समाविष्ट आहेत. या कवितांमधून ग्रामीण जीवनातील वेदना, संघर्ष आणि माणुसकी प्रभावीपणे मांडण्यात आली आहे.कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल परिवार, चापानेर तसेच तीफन परिवार, कन्नड यांच्या वतीने करण्यात आले होते. उपस्थित शिक्षकवर्ग, पालक, विद्यार्थी आणि साहित्यप्रेमींनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचे कस्तुरबा परिवाराच्या वतीने

अध्यक्ष दशरथ सोमासे प्राचार्य कौशल्य समोसे यांच्यासह सर्व शिक्षकांनी स्वागत सन्मान केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण दाभाडे यांनी प्रभावीपणे पार पडले. साहित्य, संस्कार आणि संस्कृती यांचा संगम असलेला हा पुस्तक प्रकाशन सोहळा उपस्थितांच्या मनावर ठसा उमटवून गेला.






## थांब कविते

थांब कविते नोंद घेतो
इतिहास विसरलेल्या
या नादान वर्तमानाची
झाडाच्या कत्तलीतून
जन्मलेल्या कागदांची
कागदपत्री चालणाऱ्या
रोजरोजच्या खेळाची..

थांब कविते नोंद घेतो
काळीज गहाण ठेवणाऱ्या
बळीराजा बापाची
सोन्यासारख्या पिकाच्या
मातीमोल भावाची
पोशिंद्याला लुटणाऱ्या
इथल्या साऱ्या बोक्यांची
विषारी औषध माराने
रडणाऱ्या मातीची..

थांब कविते नोंद घेतो
ओल्या कोरड्या दुष्काळाची
मिरगाच्या पावसाची
वैशाखाच्या वनव्याची
बांधावरच्या गवताची
कोरड्या ठाक विहिरीची
भेगाळलेल्या शिवाराची..

थांब कविते नोंद घेतो
टक्केवारीच्या चिखलात
वाट लागलेल्या रस्त्याची
गावोगावी वेशीवर
लटकलेल्या रंगीबेरंगी बॅनर्सची
वारकरी गाव माझं
उध्वस्त होत चालल्याची ..

थांब कविते नोंद घेतो
पदव्यांच्या कारखान्याची
बेकारांच्या फौजेची
हरवलेल्या ज्ञानाची
मायमराठी शाळेला
लागलेल्या गळतीची
वाढलेल्या दप्तराची
विकतच्या शिक्षणाची
पोपटपंची इंग्रजीच्या
हायफाय दिसण्याची..

थांब कविते नोंद घेतो
रस्त्यावरील डांबराची
भिंतीवरील सिमेंटची
बदललेल्या गावाची
भेदरलेल्या कळीची
माणूसपण हरवलेल्या
ऑनलाईन माणसाची ..

थांब कविते नोंद घेतो
पोशिंद्याच्या घामाची
उपासपोटी जगण्याची
जगण्यासाठी लढण्याची
वाटा साऱ्या बंद होता
गळफास घेण्याची..

थांब कविते नोंद घेतो
उसवलेल्या नात्यांची
रुसलेल्या वाटांची
फाटलेल्या आभाळाची
तुटलेल्या आयुष्याची
बळीराजा बापाची
माय माती माणसाची..



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ३० डिसेंबर २०२५

## शिवाजी महाविद्यालय कन्नड रेड रिबन क्लब व एन एस एस अंतर्गत ग्रामीण रूग्णालय कन्नड समूपदेशन केंद्र येथे मार्गदर्शन"



**कन्नड :** माननीय प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या आदेशान्वये इंटेन्सीफाईट आय इ सी कॅम्पियन अंतर्गत माननीय जिल्हा शल्य चिकित्सक , जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती साधना गंगावणे जिल्हा कार्यक्रम अधिकारी (डापकू )माननीय वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय कन्नड यांच्या समन्वयातून आज 29/12/2025 रोजी शिवाजी महाविद्यालय कन्नड येथील रेड क्लब एन. एस. एस. च्या विद्यार्थ्यांना आयसीटीसी केंद्र ग्रामीण रूग्णालय कन्नड या ठिकाणी एच आय व्ही /एड्स विषयी जनजागृतीपर भेट आणि मार्गदर्शन आयोजन करण्यात आले. यामध्ये शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. विजय भोसले सर यांचे अमूल्य सहकार्य मिळाले यामधे श्री संजय सोनवणे आयसीटीसी समुपदेशक व श्री शशिकांत गांगुर्डे आयसीटीसी प्रयोगशाळा तंत्रज्ञ ग्रामीण रुग्णालय, कन्नड यांनी विद्यार्थायाना समूपदेशन केंद्राबाबत माहिती दिली तसेच विविध उपक्रम आणि सूविधाबाबत माहिती दिली. यामधे विद्यार्थी ऋषीकेश निकम, मयूरी पवार, रूपाली बोंबले, कमलेश कदम, रोहित थेटे, रोशन जाधव,कार्तिक तसेच रेड रिबन क्लब प्रमूख प्रा. प्रशांत संघई, एन.एस.एस. प्रमूख प्रा. प्रकाश महाजन , प्रा. राकेश आहिरराव, प्रा. काशिद मॅडम आदि उपस्थित होते.

## दुचाकी त साडीचे पदर अडकला महिला जखमी






**दौलताबाद (जावेद अहेमद) :** दुचाकी त साडीचे पदर अडकला महिला जखमी धुळे - सोलापूर हायवेवर, फतियाबाद येथे, आयुष पेपर मिल समोर दुचाकीवर जात असतांनी साडीचा पदर मागच्या टायर मध्ये गुतल्याने अपघात झाला दि २८ डिसेंबर रविवार रोजी सायंकाळी पाच वाजता MH.20.FX.6017 दुचाकी.वरून जात असताना दुचाकी पाठीमागे बसलेल्या महिला रेणुका शंकर शेलार, वय-२५, रा.जांभाळा,ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांचे साडीचे पदर दुचाकी च्या मागील चाक मध्ये अडकुन खाली पडून जखमी झाली आहेत्यांना जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य रुग्णवाहीकेने घटनास्थळी जाऊन अपघातग्रस्त महिलेला छत्रपती संभाजीनगर मधील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे

## कर्मवीर रामराव आण्णा बहिरगावकर यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन



**कन्नड(अरुण थोरात):** कन्नड सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक, आदर्शगाव संकल्पनेचे प्रणेते कर्मवीर रामराव आण्णा बहिरगावकर यांच्या ३३ व्या स्मृती दिनानिमित्त दि. २९ डिसेंबर रोजी बहिरगाव येथे अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कर्मवीर अण्णांच्या पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करण्यात आली. व्यासपीठावर कार्तिकराव दापके, आण्णासाहेब चव्हाण मा.सरपंच चिकलठाण, प्रतापराव चव्हाण, सचिन चव्हाण संचालक ख. वि. संघ, मधुकर आदिक, नगरसेवक अब्दुल जावेद अब्दुल वाहेद, प्रकाश अग्रवाल, मुक्तार शहा सरपंच दाभाडी, ॲड चंदु शहा, ॲड मोहीते, ॲड राजेश कुलकर्णी, नगरसेवक सुनील पवार, ॲड भिमराव पवार, कौतिकराव पवार, भास्करराव पवार, सरपंच डॉ. केशव शिरसे, नामदेव दापके, शिवाजी जाधव, किशोर सोनावणे, साईनाथ जाधव, आदींची उपस्थिती होती. आण्णासाहेब चव्हाण यांनी आपल्या प्रास्ताविकात कर्मवीर अण्णां च्या ग्रामविकासाच्या कार्य विषयी माहिती दिली. प्रताप चव्हाण यांनी आपल्या भाषणात स्वर्गीय अण्णांच्या आठवणींना उजाळा दिला. स्वर्गीय अण्णांच्या पुण्यतिथी निमित्त बहिरगाव जि प शाळेतील आदर्श शिक्षक सलीम अत्तार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी शिवाजी पाटील, राजेंद्र पवार, संताराम आदिक, मुक्तार शाहा, रमेश मोरे, अशोक पवार, गंगाराम दापके, मधुकर जाधव, रंगनाथ जाधव, रवींद्र पवार, राजीव राऊत, अजय पवार, रामकृष्ण दापके, रावसाहेब दापके, प्रदीप पवार, किशोर, नरवडे, प्रफुल्ल सोनावणे, भूषण पाटील, गणेश पवार, ज्ञानेश्वर पवार, राहुल पवार, कृष्णा पवार, बापू सोनावणे, संदीप पवार, संजय पवार, मनोज पवार, किशोर पवार आदींची उपस्थिती होती.

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903